॥श्री॥

# ग्रंथप्रवेश

वेदान्तशास्त्राच्या कोणत्याही प्रमाणभूत ग्रंथामध्ये ब्रह्म, ईश्वर, जीव व जगत् ह्यांचा व त्यांच्या परस्पर संबंधांचा विचार केलेला असतो व तसे करणे अनिवार्य असते. पुढील तक्त्यामध्ये जगत् वगळून अन्य तीन तत्त्वांची मांडणी केली आहे.

| क्र. | तपशील | जीव | ईश्वर | ब्रह्म |
|---|---|---|---|---|
| १ | **सापेक्षता** | देहसापेक्ष | जगत्सापेक्ष | निरपेक्ष |
| २ | **बंध** | बद्ध | नित्यमुक्त | बंधमोक्षातीत |
| ३ | **ज्ञान** | अल्पज्ञ | सर्वज्ञ | ज्ञानरूप |
| ४ | **संकल्प** | प्रारब्धवश | सत्यसंकल्प | संकल्पशून्य |
| ५ | **उपाधी** | अविद्या | माया | निरुपाधिक |
| ६ | **जन्म** | कर्मविग्रह | लीलाविग्रह | अज |
| ७ | **उपासना** | उपासक | उपास्य | अनुपास्य |
| ८ | **नियंत्रण** | नियम्य | नियामक | अधिष्ठान |
| ९ | **गुण** | त्रिगुण | शुद्धसत्त्व | निर्गुण |
| १० | **अस्तित्व** | साकार | सगुण-निराकार | निर्गुण-निराकार |
| ११ | **सिद्धी** | अज्ञानजन्य | शास्त्र व तर्क | नित्यसिद्ध |
| १२ | **कर्म** | कर्ता | करविता | अकर्ता |
| १३ | **आयुष्य** | अल्प | दीर्घ | अनादिनित्य |
| १४ | **सुख** | सुखी-दुःखी | साक्षी | सुखरूप |

| क्र | तपशील | जीव | ईश्वर | ब्रह्म |
|---|---|---|---|---|
| १५ | **जग** | जगात राहतो | जगत्कर्ता | अधिष्ठान |
| १६ | **शरीर** | पिंड - तीन देह | ब्रह्मांड - तीन देह | अशरीरी |
| १७ | **प्रकृती** | अष्टधा | शुद्धसत्त्व | अधिष्ठान |
| १८ | **शक्ती** | अल्प | सर्वशक्तिमान | अधिष्ठान |
| १९ | **व्याप्ती** | अल्पव्यापी | ब्रह्मांडव्यापक | सर्वव्यापक |
| २० | **पुरुष** | क्षर | अक्षर | उत्तम |
| २१ | **विकार** | सहा | जन्ममरण | निर्विकार |
| २२ | **मन** | पिंडापुरते | विश्वव्यापक | अमन |
| २३ | **प्राण** | प्राण - १० | हिरण्यगर्भ | अप्राण |
| २४ | **बुद्धी** | वासनामय | वासनारहित | अपापविद्ध |
| २५ | **शास्त्रातील वर्णन** | अवलक्षण | तटस्थलक्षण | स्वरूपलक्षण |
| २६ | **अवस्था** | जाग्रतादी तीन | जागृतादी तीन | अवस्थातीत |

पंचदशीत किंवा वेदान्तशास्त्रात जीव, ईश्वर व ब्रह्म ह्या तीन तत्त्वांचा केलेला विचार वरील तक्त्यात बहुधा सर्वप्रकारे झाला आहे. जगताचा विचार पंचमहाभूतविवेकात केलेला आहे. मोक्षशास्त्रात हा विचार आवश्यक आहे.

मोक्ष म्हणजे मुक्ती किंवा सुटका. मरणानंतरच्या मुक्तीला समर्थ 'उधारीतील मोक्ष' असे म्हणतात. शास्त्राने ही मुक्ती मान्य केली असली व बहुतांश साधक त्याप्रकारे मुक्त होत असले तरी मोक्षाचे खरे वैभव जीवन्मुक्तीत आहे व ते सर्वमान्य आहे. जिवंत असतानाच सर्वप्रकारच्या दु:खातून कायमची सुटका होऊन आनंदमय जीवन जगणे हे जीवन्मुक्तीचे स्वरूप आहे.वास्तविक जीव आत्मरूप म्हणजे मूळचा ब्रह्मरूपच आहे. पण अज्ञानामुळे त्याला आपल्या मूळ स्वरूपाचा विसर पडून तो स्वत:ला शरीर, मन, प्राण इत्यादी समजू लागतो. त्यामुळे शरीराची उंची, वर्ण इत्यादी धर्म, मनाचे सर्व स्वभाव व प्राणांचे कासावीस होणे, प्राण जाणे इत्यादी स्थूल व सूक्ष्म देहांचे सर्व धर्म तो माझे म्हणजे आत्म्याचे धर्म आहेत असे समजून दु:खी, अस्वस्थ व भयभीत होतो. जीव ही शास्त्रकारांनी बसवलेली एक संकल्पना आहे. मोक्षाच्या साधनेसाठी जी एक प्रणाली किंवा व्यवस्था करावी लागते त्या कृत्रिम व्यवस्थेचे जीव, आत्मा, बुद्धी, ब्रह्म, ईश्वर इत्यादी सर्व घटक आहेत. ते एकदा समजावून घेतले की नि:शंकपणे ग्रंथाचा अभ्यास करून मोक्षासाठी साधना करता येते.

'ब्रह्म' ह्या शब्दाचा 'व्यापक' असा अर्थ होतो. वेद असे सांगतात की हे ब्रह्म नावाचे तत्त्व केव्हापासून आहे, कोठून कोठपर्यंत आहे, किती टिकते, कोठे सुरू होऊन कोठे संपते इत्यादी प्रकारे त्याचे वर्णन करणे शक्य नाही. अनंतकोडी ब्रह्मांडे व लक्षावधी जीवसृष्टी ह्यांच्या पूर्वीपासून ते आहे, ती सर्व असतांना ते आहे व ती सर्व नष्ट झाल्यावरही ते आहेच. ह्यालाच ' सत् ब्रह्म' म्हणतात. ब्रह्म ज्ञानरूप आहे. आपल्या समोर ज्ञान हा शब्द येताच कोणाला ज्ञान, कशाचे ज्ञान, कशाने ज्ञान, किती ज्ञान, केव्हा ज्ञान असे प्रश्न उभे राहतात. अशा ज्ञानाला 'सविशेष ज्ञान' म्हणतात. पण ब्रह्म हे ज्ञानरूपच आहे. त्यामुळे ज्ञान होण्यासाठी काहीतरी, ज्ञान करून घेणारा कोणीतरी, ज्ञानासाठी डोळ्यासारखी इंद्रिये, होणारे ज्ञान समजावून घेणारी बुद्धी इत्यादी काही नसतांनाही ब्रह्म शुद्ध ज्ञानरूप आहे. त्याला 'निर्विशेष व निर्विषय ज्ञान' म्हणतात. ब्रह्म आनंदरूप आहे. आपल्याला जेव्हा सुख होते तेव्हा कशाचे सुख, किती सुख, किती वेळ टिकणारे सुख, कोणाला सुख, सुखाचे माध्यम इत्यादी अनेक प्रकारे विचार करावा लागतो. ब्रह्म ह्या सर्वांवाचून सुखरूप म्हणजे आनंदमय आहे. बीजरूपाने असणे, जन्माला येणे, वाढणे, झिजणे, दौर्बल्य येणे व नाश होणे असे सहा विकार ब्रह्माला नाहीत. असे ब्रह्म मी आहे हा अनुभव घेणे ह्याला ब्रह्मज्ञान म्हणतात.

शास्त्र असे सांगते की ह्या ब्रह्माला 'मी एकटे आहे. मी बहु व्हावे' असे स्फुरण झाले. ह्या स्फुरणालाच घनअज्ञान किंवा ईश्वर म्हणतात. निर्विशेष ब्रह्म 'मी' ह्या जाणीवेमुळे सविशेष झाले. ही जाणीव हेच अज्ञान ! हीच मूळमाया. विशेषासह म्हणजे सविशेष. विशेषावाचून म्हणजे निर्विशेष. जेथे

एखादा विशेष असतो तेथे तो विशेष हे एक व ज्याला किंवा ज्याचा तो विशेष आहे तो किंवा ते दोन, असे द्वैत असते. त्यामुळे जगत् हा ब्रह्माचा विशेष मानला तर द्वैत होते. अद्वैत तत्त्वज्ञानात जगताला विशेष न मानता भास किंवा भ्रम मानले आहे. हे वाक्य विचित्र वाटते. पण 'विशेषासह असलेले ज्ञान' अशी फेररचना केली की तेच वाक्य बरोबर वाटते. आपल्याला सविशेष ज्ञानाची इतकी सवय झाली आहे की निर्विशेष ज्ञान असू शकते हेही आपल्या लक्षात येत नाही. एक ज्ञान तरी किंवा अज्ञान तरी आपण समजू शकतो. ब्रह्म हे जणू तरंगरहित पाण्याप्रमाणे निर्विशेष ज्ञानघन आहे. त्यावर'मी' ह्या ज्ञानाचा तरंग उठला की त्याचे ज्ञानघनत्व मोडून ते सविशेष बनते. 'मी'ने त्या ज्ञानाला मर्यादा निर्माण होते. 'मी'मुळे त्यात द्वैत निर्माण होते. ब्रह्माला अशा प्रकारे माया हा विशेष निर्माण झाला की त्याला मायाविशिष्ट असे म्हणतात व त्यालाच ईश्वर म्हणतात. हा ईश्वर जगाची उत्पत्ती, स्थिती व लय करतो. जड व जीवसृष्टीचे तो नियंत्रण करतो. ह्या नियंत्रणासाठी तो सर्वज्ञ, सर्वशक्तिमान व सर्वसाक्षी असावा लागतो. हा सर्व व्यवहार तो करीत असूनही त्यात तो अडकत नसल्याने त्याला नित्यमुक्त म्हणतात. हा ईश्वर शुद्ध सत्त्वगुणाचा पण निराकार असतो. ईश्वराची उपासना करून त्याची कृपा झाली असता मोक्षाची इच्छा निर्माण होते व पुढे श्रीगुरुकृपा व शास्त्रकृपा होऊन मोक्षरूप आत्मकृपा होते. ईश्वराच्या आज्ञेनुसार निष्काम कर्माने चित्त शुद्ध होऊन मायेची 'मल' नावाची शक्ती निवृत्त होते. म्हणजे पापाची इच्छा होत नाही. ईश्वराची निष्काम उपासना केल्याने मायेची 'विक्षेप' नावाची शक्ती निवृत्त होऊन चित्ताचे चांचल्य थांबून ते शांत होते.

जीवाने कर्म व उपासनेच्या साहाय्याने चित्त शुद्ध व शांत करून श्रीगुरुकृपेने त्या चित्ताचा चैतन्यात लय करावयाचा असतो. ह्यालाच मोक्ष म्हणतात. ब्रह्म जेव्हा एखाद्या शरीरामुळे जणू मर्यादित होते तेव्हा त्याला आत्मा म्हणतात. हा आत्मा जेव्हा त्या शरीरातील बुद्धीच्या प्रभावाखाली राहून 'मी देह आहे' असे मानतो तेव्हा त्या आत्म्याला जीव म्हणतात. म्हणजे ब्रह्म हेच आत्मा व जीव असते. परंतु आत्मरूप ब्रह्माची बुद्धीच्या प्रभावाखालून सोडवणूक करून त्याला जणू पुन्हा मुक्त करावे लागते. आत्मा शरीरात सर्वत्र व्यापून राहतो. अंत:करणही तसेच व्यापून असते. ते स्वभावाने शुद्ध म्हणजे जणू पारदर्शक काचेप्रमाणे असते. त्यामुळे पारदर्शक काचेत जसा प्रकाश पसरावा त्याप्रमाणे अंत:करणात ज्ञानरूप आत्मप्रकाश पसरतो. ह्या पसरलेल्या आत्मप्रकाशाला चिदाभास असे नाव असून तोही सर्व शरीरभर व्यापून राहतो. आत्मा, अंत:करण व त्यात पसरलेला आत्मप्रकाश ह्या तिन्हींना मिळून जीव असे नाव दिले आहे. म्हणून जीवही सर्व शरीरात व्यापून राहतो. ध्यान किंवा विचाराने अंत:करण लीन किंवा बाधित झाले असता चिदाभास अंत:करणापासून सुटून आत्माकार होऊन राहतो. हाच मोक्ष. हेच कैवल्य. मोक्ष हा बंधनसापेक्ष शब्द आहे. हे बंधन कोणावर आहे? केव्हापासून आहे? ते सत्य आहे की कल्पित? ते कोणाचे आहे? इत्यादी सर्व प्रश्नांची उत्तरे समजणे आवश्यक आहे. ती उत्तरे अशी -

१) बंधन जीवावर असते. आत्मा नित्यमुक्त असल्याने त्याला बंधन नाही. देह अचेतन असल्याने देह व देहाच्या अंत:करणादी घटकांनाही बंधन शक्य नाही.

२)	बंधन अनादी काळापासून आहे. पहिली जीवसृष्टी केव्हा निर्माण झाली हे कोणालाच सांगता येत नाही. हेच अनादित्व.

३)	बंधन कल्पित आहे कारण सत्य त्रिकालाबाधित असते. जे तिन्ही काळात अबाधित आहे, त्यातून सुटका होणे शक्य नाही. बंधन सत्य असते तर त्यातून सुटकाच झाली नसती. ज्याअर्थी शास्त्र मोक्षसाधन सांगते व मुक्ताचे वर्णन करते त्याअर्थी बंधन सत्य असणे शक्य नाही.

४)	बंधन अविद्येचे असते. जी माया जीवाला जीवभाव पत्करून 'मी देह', 'मी कर्ता', 'मी मर्त्य' असे म्हणावयास लावते त्या मायेलाच अविद्या असे म्हणतात. अविद्या ही मायेची एक शक्ती आहे. अज्ञान ही मायेची दुसरी शक्ती असून तिच्यामुळे हे जगत् सत्य व भोग्य वाटते. ते भेदाने भरलेले दिसते.

आपल्याला जी सृष्टी दिसते ती पृथ्वी, आप, तेज, वायू व आकाश अशा पाच महाभूतांचे विशिष्ट प्रमाणात मिश्रण होऊन तयार झाली आहे. ही पंचधा प्रकृती होय. जीवसृष्टीमध्ये ह्या पाच महाभूतांखेरीज मन, बुद्धी व अहंकार (रज, सत्त्व व तम या तीन गुणांचे) असे तीन घटक जास्त असल्याने त्यात अष्टधा प्रकृती असते. ब्रह्म ह्या सर्वांत व्यापून असते. अंत:करणात पसरणाऱ्या आत्मप्रकाशामुळे जीवत्व येते. अंत:करण नसले की जडत्व असते. वास्तविक ह्या सर्वांचे ब्रह्म हे कारण आहे. उपनिषद असे सांगते की आत्म्यापासून प्रथम आकाश, नंतर क्रमशः वायू, अग्नी, पाणी व पृथ्वी निर्माण झाली. ह्या प्रत्येक निर्मितीनंतर आत्म्याने त्यात प्रवेश केला. ज्याप्रमाणे मातीपासून लक्षावधी मडकी तयार झाली तरी त्यात मातीशिवाय काही नसते, त्याप्रमाणे आत्म्यापासून अनंत सृष्टी निर्माण झाली तरी त्यात आत्म्याशिवाय दुसरे काही नसते. हे कळणे म्हणजे ज्ञान व न कळणे म्हणजे अज्ञान. ज्याप्रमाणे अज्ञानामुळे माणूस मडक्यांच्या निरनिराळ्या आकारात, नामात, रंगात, सौंदर्यात, उपयुक्ततेत, किंमतीत व मालकीत रमून जातो; त्याप्रमाणे आत्मा न जाणल्याने माणूस अनंत विविधतेने भरलेल्या जगतात रंगून जातो. स्वत:चे शरीर हेही त्या जगताचाच एक भाग आहे त्यामुळे जगाला जसे विकार असतात तसेच शरीरालाही असतात. म्हणून जग व शरीर ह्यांचे ऐक्य असून आत्मा व ब्रह्म ह्यांचे ऐक्य आहे. ह्या ऐक्याचा अनुभव घेऊन व त्याचे भान ठेवून शरीराने जगामध्ये जगणे ह्यालाच जीवन्मुक्ती म्हणतात. हे जीवन आनंदमय असून त्यात प्रारब्धाने दु:खाची कारणे तयार झाली तरी दु:ख होत नाही. सुखाची कारणे निर्माण झाली तरी सुख होत नाही. म्हणजे सुखदु:खाचा क्षणिक अनुभव आला तरी त्यांचे प्रवाह तयार होत नाहीत. तो सुखाने संतुष्ट होत नाही व दु:खाने विषण्ण होत नाही. (ज्ञाने.)

श्रीविद्यारण्यस्वामींचे तत्त्वज्ञान प्रस्थानत्रयीच्या शांकरभाष्याशी सुसंगत असल्याने त्यांनी जसे ते मांडले आहे तसे त्याचे स्पष्टीकरण केले आहे. पूर्वपक्षाची मांडणी न करता केवळ सिद्धान्तपक्षाची मांडणी केल्याने मुमुक्षूचा बौद्धिक गोंधळ न होता त्याला साधनारूढ होणे सोपे पडते. हल्लीच्या दिवसात मतमतांतरांची परीक्षा करून सिद्धान्तपक्ष समजावून घेण्याइतका वेळ व त्यासाठी अनुकूल शिक्षण उपलब्ध नाही. न्याय व व्याकरणाचे संस्कार होत नाहीत. संस्कृत कळत नाही. मोठ्या आकाराचे ग्रंथ पाहूनच

धडकी भरते. पाश्चात्य तत्त्वज्ञानाच्या संस्कारातून वैदिक वाङ्‌मयाकडे पाहण्याची प्रवृत्ती वाढत आहे. त्या तत्त्वज्ञानात ब्रह्मज्ञान, आत्मसाक्षात्कार, जीवब्रह्मैक्य ह्या संकल्पना अविकसित आहेत. म्हणून पाश्चात्य तत्त्वज्ञानाच्या डोळ्यांनी, मोक्षकल्पना परिपूर्ण विकसित झालेल्या वैदिक तत्त्वज्ञानाकडे पाहण्याची कल्पनाच विपरीत व विकृत आहे. त्याच बरोबर हिमालयातील साधूंच्या चमत्कृतिपूर्ण जीवनांची वर्णने करणारे इंग्रजी ग्रंथ लोकप्रिय होत आहेत. त्यामुळे प्रस्थानत्रयीच्या अभ्यासाकडे उच्चशिक्षितांची प्रवृत्ती कमी होत आहे. जे. कृष्णमूर्ती, भगवान रजनीश ह्यांच्या अफाट वाङ्‌मयसंपदेकडे बुद्धिमंत आकृष्ट होत आहेत. प्रस्थानत्रयीचा शास्त्रशुद्ध व अनुभवसिद्ध अभ्यास करणे जणू मागासलेपणाचे लक्षण ठरत असून संतवाङ्‌मयाला तर भोळ्याभाबड्यांच्या ग्रंथांचा दर्जा प्राप्त होत आहे. वैदिक कल्पनेनुसार ज्याला खरोखर मोक्ष हवा आहे व तो आहे त्या घरात राहून, असलेल्या माणसांसह व असलेल्या परिस्थितीत राहून हवा आहे, त्याने पंचदशीचा अवश्य अभ्यास करावा. आपली मिळकत, उपलब्ध असलेला वेळ, कामाचे स्वरूप, राहाते घर, कुटुंबीय व अन्य जबाबदाऱ्या ह्यांचा विचार केला असता नेमके शास्त्रवाङ्‌मय सोडून इतर वाङ्‌मय वाचण्याची चैन परवडणारी नाही. ह्या दृष्टीने विचार केला असता पंचदशी हा परिपूर्ण ग्रंथ आहे.

पाच विवेक, पाच दीप व पाच आनंद अशा पंधरा प्रकरणांची ह्या ग्रंथाची रचना आहे. विवेक म्हणजे सांगोपांग विचार करून काढलेला निष्कर्ष. दीप म्हणजे काही विशिष्ट विषयांवर टाकलेला प्रकाश म्हणजे स्पष्टीकरण. आनंद प्रकरणात पाच प्रकारांनी मिळणाऱ्या आनंदाचा तपशील सांगितला आहे. ह्या पाचा पाचांच्या तीन गटांचा आराखडा प्रस्तावनेत दिला आहे. त्यात त्या त्या प्रकरणातील विषयांचा गोषवारा दिला आहे. अधिक माहिती द्यावी तर थोडक्यात पंचदशीच लिहावी लागेल. आतापर्यंत ग्रंथप्रवेशासाठी जे काही लिहिले आहे त्या विषयीही काही शंका उपस्थित होतात. पण श्रद्धेने ते सर्व स्वीकारून त्याचे साधनात रूपांतर केले असता प्रत्यक्ष अनुभवाच्या पातळीवर सर्व शंका मावळतात. तरी काही शंकांचा परामर्श घेतला पाहिजे.

**१) साधना कोण करतो?**

बुद्धी जड असल्याने ती काही करीत नाही. आत्मा नित्यमुक्त असल्याने त्याला साधनेची गरज नाही. म्हणून जीव हा मुमुक्षू असतो. अंत:करणातील चिदाभासाने स्वत:ची बुद्धीतून सोडवण केली की चिदाभासाला ‘मी ब्रह्म आहे’ असे ज्ञान होते. अविद्येच्या प्रभावामुळे चिदाभास बुद्धीतील वासनांनुसार आचरण करतो. त्या वासनांचा क्षय करून ध्यानाने किंवा आत्मानात्मविचाराने बुद्धी (अंत:करण) निवृत्त झाली असता चिदाभास स्वत:च्या मूळ स्वरूपात म्हणजे आत्म्यात जणू पुन्हा एकरूप होतो. ह्यालाच नित्यप्राप्ताची प्राप्ती म्हणतात.

**२) ब्रह्माला स्फुरण कसे होते? -**

ब्रह्म अमन, अप्राण, अकाम आहे असे उपनिषद सांगते. स्फुरण अंत:करणाशिवाय (मन) होणे

शक्य नाही. मग 'मी एक आहे' असे स्फुरण ब्रह्माला कसे होईल? सुरवातीलाच आपण पाहिले आहे की शास्त्र कृत्रिम असून त्याने आपल्या म्हणजे साधकाच्या सोयीसाठी काही प्रणाली बसवून दिल्या आहेत. त्या प्रणालीत अध्यारोप व अपवाद ह्यांचा समावेश होतो. अध्यारोप म्हणजे जे वस्तुत: नाही ते समजुतीपुरते स्वीकारणे. अपवाद म्हणजे जे वास्तव आहे ते सांगणे. कोट्यवधी माणसांना भोवतीचे जग सत्य वाटते. त्यामुळे अध्यारोप पत्करून ते ब्रह्मापासून निर्माण झाले असे सांगावे लागते. साधक साधनारूढ होऊन वेदान्तशास्त्राच्या खोलीत त्याचा प्रवेश झाल्यावर दृश्य जगत् कल्पित आहे (मायावाद) किंवा ते मुळातच नाही (अजातवाद = अपवाद) असे त्याचे त्यालाच समजू लागते.

३) **घनअज्ञान म्हणजे ईश्वर कसा? -**

ईश्वर हे तत्त्व केवळ शास्त्र सांगते म्हणून मानावे लागते किंवा त्याचे अस्तित्व तर्काने समजून घेता येते. 'ईश्वर मी आहे' असा 'ब्रह्म मी आहे' प्रमाणे अपरोक्ष म्हणजे प्रत्यक्ष अनुभव येत नाही. ज्ञानरूप ब्रह्मात जे 'मी' हे अहंरूप अज्ञान उमटले तेच घनअज्ञान. तोच ईश्वर. येथे शास्त्र हेच प्रमाण आहे.

ग्रंथप्रवेशाच्या निमित्ताने वेदान्तशास्त्रातील सर्व संकल्पना सांगणे शक्य नाही व तशी आवश्यकताही नाही. ज्या त्या प्रकरणात त्या त्या विषयाचे स्पष्टीकरण होईलच. वेदान्तशास्त्राची जटिलता काढून टाकून हल्लीच्या भाषेत ते शास्त्र सांगणे आवश्यक झाले आहे. त्याचबरोबर वेदान्तशास्त्र संत कोणत्या भाषेत मांडतात तेही समजावून घेतले की संतवाङ्मयाला वेदान्तशास्त्राची भक्कम बैठक असल्याचे लक्षात येते. त्यामुळे संतवाङ्मयाची खोली कळून साधकाचा मोक्षमार्गाकडील प्रवास सुकर होतो. हे सर्व हेतू मनात धरून ह्या ग्रंथावर टीका लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.

श्लोकांचा अन्वय दिला असला तरी मराठी अर्थ लिहिताना तो अन्वयाला धरून लिहिलेला नाही हे मुद्दाम लक्षात घ्यावे. अन्वयाला धरून लिहिलेला अर्थ आडवळणी असू शकतो. अर्थ सहजपणे समजण्यात त्याने अडचण येऊ शकते. म्हणून विद्वानांची नाराजी पत्करून जाणीवपूर्वक तसे केले आहे. वाचकांना आवडेल असा विश्वास वाटतो.

***